टोचले ते पुरेसे आहेत. तेव्हा
मुळे व कपटामुळे तुटलेली मैत्री
ाच शक्य नसते. तुटलेला मोती
ेत नाही. मोती तुटू नये याची
नी घ्यायची आहे.

ो टोचले कान

## शहाणे व्हा!

दकीय पान ४


# सामना

★★ मुंबई आवृत्ती

वर्ष : २५ ● अंक : १५१ ● (पृष्ठे १०) ● मुंबई, सोमवार, २४ जून २०१३ ● मूल्य : ३.०० रुपये


# महाप्रलयात ५ हजार बळी

**१२ हजार यात्रेकरूंचा जीव टांगणीला | थकलेल्या भाविकांची अन्नपाण्यावाचून तडफड**

डेहराडून, दि. २३ (वृत्तसंस्था) - उत्तराखंडवर कोसळलेल्या अस्मानी संकटाने केदारनाथ, बद्रीनाथ आणि गौरीकुंड परिसरात मृत्यूने तांडवच घडवले आहे. या महाप्रलयात पाच हजार यात्रेकरूंचा बळी गेल्याची कबुलीच उत्तराखंडचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री यशपाल आर्य यांनी दिली आहे. जागोजागी दुर्गम भागात अडकून पडलेल्या हजारो यात्रेकरूंचे प्राण लष्कराने वाचविले असले तरी अजूनही १२ हजार यात्रेकरू डोंगरदऱ्यांमध्ये अडकून पडले आहेत. त्यातच हवामान खात्याने या परिसराला उद्या सोमवारपासून अतिवृष्टीचा धोका असल्याचे जाहीर केल्याने सुटकेच्या प्रतीक्षेत असलेल्या १२ हजार यात्रेकरूंचा जीव पुन्हा टांगणीला लागला आहे. ■ पान ८

### बेपत्ता भाविकांना 'नेत्र'ने शोधले

ठिकठिकाणी अडकून पडलेल्या व कोणाशीही संपर्क साधू न शकलेल्या यात्रेकरूंच्या शोधासाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाने आज 'नेत्र' या मानवविरहीत विमानाचा वापर केला. उद्याही 'नेत्र'च्या सहाय्याने यात्रेकरूंचा शोध घेण्यात येणार आहे.



### केदारनाथ यात्रा दोन वर्षे बंद



डेहराडून - महाप्रलयाने अभूतपूर्व तडाखा दिलेली केदारनाथ यात्रा पुढील दोन वर्षे बंद ठेवली जाईल अशी घोषणा उत्तराखंडचे मुख्यमंत्री विजय बहुगुणा यांनी आज येथे केली. सर्वच पूरग्रस्तांना बाहेर काढण्यासाठी आणखी दोन आठवडे लागतील, असे त्यांनी सांगितले.

### महाराष्ट्रातील १६०८ यात्रेकरू परतले

उत्तराखंडात अडकलेल्या महाराष्ट्रातील १६०८ यात्रेकरूंची सुखरूप सुटका करण्यात आली असून ते घराच्या दिशेने रवानाही झाले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आज दिली. मुख्यमंत्री उत्तराखंडमधील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी डेहराडूनला गेले होते. तेथून परतल्यानंतर दिल्ली येथे त्यांनी ही माहिती दिली.



युवा सेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या संकल्पनेतून अंधेरी येथील शहाजी राजे क्रीडा संकुलात साकारलेल्या मँचेस्टर युनायटेड फुटबॉल स्कूलचे उद्घाटन राज्यपाल के. शंकरनारायणन यांच्या हस्ते रविवारी झाले. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, तेजस ठाकरे, महापौर सुनील प्रभू, आयुक्त सीताराम कुंटे, आमदार, ॲड. अनिल परब आदी उपस्थित होते. यावेळी राज्यपालांनी फुटबॉलला जोरदार कीक लगावली.

### आदित्यमध्ये उपजत नेतृत्व

**राज्यपालांनी केले कौतुक**

नेतृत्वगुण हे कुठे बाजारात विकत मिळत नाहीत. ते उपजत असावे लागतात. हे नेतृत्वगुण आदित्य ठाकरे याच्यात आहेत. आजोबा आणि वडिलांकडून हे नेतृत्वगुण त्याने घेतले आहेत. तरुणांविषयीची त्याची आपुलकी, त्यांच्या समस्या मांडून त्या सोडविण्याची धडपड हे पाहिल्यावर त्याच्यातील या गुणांची प्रचीती आपल्याला आली, असे राज्यपाल के. शंकरनारायणन यांनी सांगितले.

### मुंबईतील मोकळ्या जागा मुंबईकरांसाठीच

उद्धव ठाकरे यांचे स्पष्ट प्रतिपादन

■ पान ३